महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १३३ वे | दिनांक : ०९/०५/२०२६ | वार : शनिवार

## गुजरातमधील २००२ च्या पॅटर्ननुसार देशभर दंगली घडवण्याचे भाजपचे षडयंत्र:



**मुंबई :** भारतीय जनता पक्ष २०२९ च्या निवडणुका जिंकण्यासाठी देशभर धार्मिक तेढ निर्माण करत असून, २००२ च्या गुजरात दंगलींप्रमाणेच हिंसाचार घडवण्याचे षडयंत्र आखले जात आहे, असा खळबळजनक आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी शुक्रवारी केला. पाच राज्यातील निवडणुकीनंतर काही राज्यांत सुरू झालेला हिंसाचार हा याच मोठ्या कारस्थानाचा भाग असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

टिळक भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत सपकाळ यांनी केंद्र सरकार आणि भाजपावर अनेक गंभीर प्रश्नांची सरबत्ती केली. सपकाळ यांनी जनगणना आणि त्यानंतर होणाऱ्या मतदारसंघ पुनर्रचनेवर भाष्य करताना सांगितले की, "जानेवारी २०२८ मध्ये सुरू होणाऱ्या डिलिमिटेशन प्रक्रियेसाठी कोणत्या निवृत्त न्यायाधीशाला समितीत घ्यायचे, हे भाजपने आधीच ठरवले आहे. इतकेच नाही, तर पुनर्रचनेनंतरचा मतदारसंघांचा नकाशाही आत्ताच तयार आहे. ही सर्व प्रक्रिया लोकशाहीला पायदळी तुडवणारी आहे.

तामिळनाडूतील राजकीय समीकरणांवर बोलताना त्यांनी जोसेफ विजय यांच्या 'टीव्हीके' पक्षाला दिलेल्या पाठिंब्याचे समर्थन केले. "स्थानिक नेते आणि कार्यकर्त्यांची निवडणुकीपूर्वीच आघाडीची इच्छा होती. लोकशाही आणि संविधान वाचवण्यासाठी लढा देणाऱ्या पक्षांसोबत उभे राहण्यास काँग्रेस कटिबद्ध आहे," असे ते म्हणाले.

मुंबई महानगरपालिकेतील भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर बोलताना सपकाळ यांनी शेलक्या शब्दांत भाजपचा समाचार घेतला. ते म्हणाले: भ्रष्टाचारासाठी भाजपला आता शौचालयाची जागाही कमी पडत आहे. आधी सुलभ शौचालयात भ्रष्टाचार केला आणि आता मनपाच्या कामातही तेच सुरू आहे. भाजपमध्ये मोहित कंबोज यांच्यासारख्यांना मलिदा मिळतो आणि सामान्य कार्यकर्त्यांच्या नशिबी मात्र शौचालयाची जागा येत असल्याचेही ते म्हणाले.

## लाखो मुंबईकरांसाठी आदित्य ठाकरेंचे देवेंद्र फडणवीसांना थेट पत्र



**मुंबई :** मुंबईतील सेस आणि नॉन सेस इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे. विशेषतः जुन्या आणि धोकादायक अवस्थेतील इमारतींच्या दुरुस्ती तसेच पुनर्विकासासाठी मुख्यमंत्री विशेष निधीतून तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. येत्या पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर अनेक इमारतींची स्थिती गंभीर असल्याने मुंबईकरांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.आदित्य ठाकरे यांनी आपल्या पत्रात मुंबईतील उपकरप्राप्त म्हणजेच सेस इमारतींसह नॉन सेस इमारतींचाही प्रश्न गंभीर असल्याचे नमूद केले आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात या इमारतींच्या पुनर्विकासासाठी कायद्यात बदल करण्यात आले होते. मात्र, गेल्या दोन वर्षांपासून हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्याने हजारो इमारतींमधील रहिवासी अजूनही निर्णयाच्या प्रतीक्षेत आहेत. सुमारे १४ हजारांहून अधिक इमारती आणि लाखो भाडेकरू या प्रक्रियेमुळे अडकून पडल्याचा मुद्दाही त्यांनी पत्रातून मांडला आहे.

मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात आदित्य ठाकरे यांनी काही महत्त्वाच्या मागण्या केल्या आहेत. सर्व भाडेकरूंची योग्य नोंदणी करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, तसेच घरमालकांकडून होणाऱ्या दडपशाही आणि निष्कासन कारवाईपासून भाडेकरूंना संरक्षण द्यावे, अशी मागणी त्यांनी केली. याशिवाय, ज्या इमारतींची स्थिती अत्यंत खराब झाली आहे, अशा सेस आणि नॉन सेस इमारतींच्या दुरुस्ती व डागडुजीसाठी पावसाळ्यापूर्वी तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

दरम्यान, या प्रश्नात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वैयक्तिक लक्ष घालून लाखो मुंबईकरांना न्याय द्यावा, अशी अपेक्षा आदित्य ठाकरे यांनी व्यक्त केली आहे. केंद्र आणि राज्यात सत्ता असल्याने सरकारने या विषयावर ठोस निर्णय घ्यावा, असेही त्यांनी म्हटले आहे. मुंबईतील जुन्या इमारतींच्या सुरक्षिततेचा मुद्दा प्रत्येक पावसाळ्यात गंभीर बनत असताना, आता सरकार या मागण्यांवर काय भूमिका घेते, याकडे मुंबईकरांचे लक्ष लागले आहे.

## कर्जतच्या राजकारणात मोठा ट्विस्ट ; १३ नगरसेवकांचा रोहिणी घुले यांच्याविरोधात अविश्वास

**कर्जत :** अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत नगरपंचायतीत पुन्हा एकदा मोठी राजकीय उलथापालथ पाहायला मिळत आहे. नगराध्यक्ष रोहिणी सचिन घुले यांच्या विरोधात १३ नगरसेवकांनी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे अविश्वास प्रस्ताव दाखल केला आहे. नगराध्यक्षांना पदावरून हटवण्यात यावे, अशी मागणी या प्रस्तावातून करण्यात आली आहे.

नगरपंचायतीत एकूण १७ नगरसेवक असून त्यापैकी १३ जणांनी थेट नगराध्यक्षांविरोधात भूमिका घेतल्याने कर्जतच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे.

विशेष म्हणजे, या संपूर्ण घडामोडीत विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांच्या समर्थक नगरसेवकांनी एकत्र आल्याची चर्चा रंगली आहे. त्यामुळे स्थानिक राजकारणात नवे समीकरण तयार झाल्याचे चित्र दिसत आहे.

अविश्वास प्रस्तावामध्ये नगराध्यक्ष रोहिणी घुले यांच्या कारभारावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. नगरपंचायतीचे कामकाज करताना कायद्याचे उल्लंघन होत असल्याचा आरोप नगरसेवकांनी केला आहे. नगराध्यक्ष मनमानी पद्धतीने निर्णय घेतात, नगरसेवकांना विश्वासात घेत नाहीत आणि प्रभागातील नागरिकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करतात, असे प्रस्तावात नमूद करण्यात आले आहे. नगरसेवकांनी नागरिकांच्या मूलभूत सुविधांबाबत वारंवार मागण्या करूनही त्या मुद्द्यांकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष केल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

आरोग्य, दिवाबत्ती, शिक्षण, सांडपाणी व्यवस्थापन आणि इतर नागरी सुविधांबाबत नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे नगरसेवकांचे म्हणणे आहे. या प्रश्नांवर तातडीने उपाययोजना व्हाव्यात, अशी मागणी अनेकदा करण्यात आली. मात्र, नगराध्यक्षांकडून योग्य प्रतिसाद मिळाला नाही, असा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे नगरपंचायतीतील असंतोष वाढत गेला आणि अखेर अविश्वास प्रस्ताव दाखल करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०९ मे २०२६


## शासकीय योजना जनते पर्यंत पोहचविण्यासाठी राजस्व अभियान



**कन्नड (अरुण थोरात) :** विविध शासकीय योजना शेतकरी, जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी महाराजस्व अभियान राबविण्यात येत असल्याची माहिती कन्नड चे उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांनी दिली आहे.ते दि.०८ मे रोजी, महसूल विभागाच्या वतीने आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत आयोजित कार्यक्रम प्रसंगी बोलत होते. शासनाच्या अनेक कल्याणकारी योजनांची माहिती शेतकरी, नागरिक यांच्या पर्यंत पोहचविणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे. शेतकर्यांची प्रमुख समस्या असलेले शेतरस्त्यांसाठी प्रशासन काम करीत आहे. यासाठी कन्नड तालुक्यातील २०१ रस्त्यांचे मजबुतीकरण करण्याचे नियोजन आहे. विविध योजनां बरोबरच जागा उपलब्ध नसलेल्या घरकुल योजना लाभार्थ्यांना शासकीय, गायरान जमिनीवर जागा देण्यात येणार असल्याचे श्री गोरड यांनी सांगितले. यावेळी पात्र लाभार्थ्यांना रहिवासी, उत्पन्न, जातप्रमाणपत्र, शैक्षणिक कामांसाठी आवश्यक दाखले, नविन सुधारीत रेशनकार्ड, संजय गांधी निराधार योजना, शेतकरी एग्रीस्ट्याक नोंदणी, प्रलंबित फेरफार निकाली काढणे, सातबारा दुरुस्ती, डिजिटल सातबारा व ८ अ उतारा वितरण, प्रधानमंत्री किसान सन्मान योजना, यांसह नगरपरिषद, कृषीविभाग योजनांच्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्र, धनादेश वितरण करण्यात आले.कार्यक्रमास मार्गदर्शक म्हणून तहसीलदार सारिका भगत यांची उपस्थिती होती. तसेच कन्नड नगराध्यक्षा फरीन शेख, पोलीस निरीक्षक श्री सानप, जावेद शेख, तालुका कृषीअधिकारी संदीप शिरसाठ, नायब तहसिलदार दिलीपकुमार सोनावणे, कृषि उत्पन्न बाजार समिती उपसभापती जयेश बोरसे, खरेदी विक्री संघ सभापती ज्ञानेश्वर निकम, मंडळाधिकारी विकास वाघ, यांसह रविंद्र नागे, वर्षा ताठे, विद्या काशिनंद, गजानन आव्हाळे, संदीप घोडके, पुरवठा अधिकारी निलेश राठोड, महसूल कर्मचारी संघटनेचे बाळू घटे, दिपक एरंडे, ज्ञानेश्वर वाघ, दिनकर दाभाडे, रतन मधे, हरीष थोरात, आदींसह कर्मचारी, नगरसेवक, शेतकरी, लाभार्थी उपस्थित होते. सुत्रसंचालन प्रविण दाभाडे तरआभार प्रदर्शन ना.तहसीलदार श्री सोनावणे यांनी केले.


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903


## जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांचे उत्कृष्ठ सादरीकरण



**नागपूर :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी केलेल्या ऐतिहासिक विपर्यास, मानहानी कारक व भावना दुखावणारे वक्तव्याबद्दल भारतीय न्याय संहिता बी एन एस २०२३ व इतर कायद्या अन्वये त्यांचेवर आणि स्वामी स्वरूपानंद यांचे वर कायदेशीर कारवाई बाबत पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांना सकल मराठा समाज आणि समस्त शिवप्रेमीच्या वतीने ही तक्रार दाखल करण्यात आली.प्रा.डॉ.शिवानंद भानुसे यांनी निवेदन आणि तक्रारी बाबत जन आक्रोश कसा तीव्र झाला आहे हे नमुद केला. या तक्रारी बाबत सादरीकरण करतांना अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी सविस्तर पणे नमुद केले की, छत्रपती शिवाजी महाराज व सर्व महापुरुषां विषयी धीरेंद्र शास्त्री ( बागेश्वर धाम ), स्वामी स्वरूपानंद व सर्व वाचाळ विरांवर यांचेवर छत्रपती शिवाजीमहाराज व सर्व महापुरुषां विषयी धीरेंद्र शास्त्री ( बागेश्वर धाम ),स्वामी स्वरूपानंद व सर्व वाचाळ विरांवर ऐतिहासिक विपर्यास, मानहानीकारक व भावना दुखावणारे वक्तव्याबद्दल भारतीय न्याय संहिता(बी एन एस) २०२३ व इतर कायद्या अन्वये कारवाई करण्यासाठी आमची ही तक्रार आहे.पुढे त्यांनी तक्रारी बाबत मांडणी करतांना नमुद केले की,मागील काही दिवसांपासून महापुरुषां च्या विरोधात केलेल्या विकृत विधानामुळे महाराष्ट्रामध्ये कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला आहे. सदरील धीरेंद्र शास्त्री असोत किंवा इतर वाचाळवीर असोत, त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज व महाराष्ट्रा मध्ये वंदनीय असलेले सर्व महापुरुष यांच्या विरुद्ध केलेल्या विधानामुळे समस्त समाजात आणि जन सामान्यात अत्यंत रागाचे व चिड आणणारे वातावरण निर्माण झालेले आहे.या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील सर्व धर्मीय,सर्व जातीय,सर्व पक्षीय,सर्व सामाजिक संघटना व सर्व शिवप्रेमी यांच्या वतीने अशी तक्रार करण्यात येते की,दिनांक २४ एप्रिल २०२६ रोजी नागपूर नगरीत सार्वजनिक कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल खालील विधान केले: " शिवाजी महाराज अनेक लढाया लढून थकले होते... त्यांनी समर्थ रामदास स्वामींच्या पायाशी मुकुट ठेवला आणि म्हणाले 'मी थकलो आहे, आपण राज्य सांभाळावे'... "सदर विधान हे पूर्णतः असत्य, काल्पनिक आणि इतिहासाचा विपर्यास करणारे आहे तसेच वास्तवीक ऐतिहासिक व कायदेशीर आक्षेप असा आहे की,छत्रपती शिवाजी महाराज कधीही "थकले" नव्हते. त्यांनी स्वराज्याची निर्मिती रयतेसाठी केली आणि ते अखेरपर्यंत सक्रिय होते. त्यांना थकलेले दाखवणे हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा अवमान असुन या वक्तव्यामुळे भारतीय न्याय संहिता (बी एन एस) २०२३ च्या द्वेष पसरवणे,धार्मिक भावना दुखावणे आणि महापुरुषांची मानहानी करणे व या अन्वये व इतर वक्तव्य हे गंभीर गुन्हे असुन त्याच प्रमाणे धीरेंद्र शास्त्री, स्वामी स्वरूपानंद तसेच इतर वाचाळवीर यांच्यावर कठोर कारवाई करून यांना महाराष्ट्रा मध्ये कुठलाही प्रवचन व इतर मार्गाने जाहीर कार्यक्रम घेण्याची परवानगी देऊ नये. यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. वक्ताव्या वरील सामग्री हटवणे: यु ट्यूब व सोशल मीडियावरील सदर भाषणाचे आक्षेपार्ह व्हिडिओ व संबधित पोस्ट तात्काळ हटवण्यात यावेत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील सर्व धर्मीय, सर्व जातीय, सर्व पक्षीय, सर्व सामाजिक संघटना व सर्व शिवप्रेमी यांच्या वतीने अशी विनंती व तक्रार करण्यात येते की,धीरेंद्र शास्त्री,स्वामी स्वरूपानंद तसेच इतर वाचाळ वीर यांच्यावर बी एन एस व इतर लागु होणाऱ्या कायद्या प्रमाणे त्यांचेवर राष्ट्रद्रोह व नमुद कायद्या प्रमाणे व इतर अस्तित्वात असलेल्या कायद्या प्रमाणे कठोर कारवाई करून यांना महाराष्ट्रामध्ये कुठलाही कार्यक्रम घेण्याची परवानगी देऊ नये. शासनाने व प्रशासनाने सदरील तक्रारीचा गांभीर्याने विचार करून महाराष्ट्रभर सर्व धर्मीय, सर्व जातीय,सर्वपक्षीय, सामाजिक संघटनासह व सर्व शिवप्रेमी व्यापक स्वरूपात मोठे जन आंदोलन करण्याच्या मनस्थितीत असुन होणाऱ्या परिणामाची जबाबदारी शासनाची व प्रशासनाची असेल. करीता सदरच्या तक्रारी प्रमाणे गुन्हा नोंद होऊन कायदेशीर कारवाई करण्यात यावी ही तक्रार स्वीकारावी ही नम्र विनंती करण्यात आली असता पोलीस आयुक्त यांनी उपस्थित मान्यवरांना आश्वासित करतांना नमुद केले की,मी स्वतः नागपूर पोलीस अधिकारी यांना बोलुन तिथे काय व कसे गुन्हे दाखल केले याची माहिती संकलित करून कारवाई बाबत सध्य स्थीती ज्ञात करून घेतो आणि आपले म्हणणे शासना कडे पाठवतो.या प्रसंगी अनेक मान्यवरांनी आपापले मत मांडले.ज्ञानेश्वर कणके यांनी पोलीस प्रशासनाने गांभीर्याने म्हणणे ऐकून घेतल्या बद्दल समाधान व्यक्त केले.या प्रसंगी पृथ्वीराजभाऊ पवार यांचे मार्गदर्शना खाली ही तक्रार देण्यात आली त्या वेळेस डॉ.राजेंद्र दाते पाटील, प्रा. प्रदीप साळुंके, विजय काकडे धनंजय पाटील, सुनील कोटकर सतीश वेताळ, किशोर चव्हाण,सखाराम काळे, ज्ञानेश्वर गायकवाड,प्रा. डॉ पी एम वाघ, राजीव थिटे, विष्णू चव्हाण, विधीज्ञा सुवर्णा मोहिते, हेमा पाटील,रेखा वहाटूळे, रेणुका सूर्यवंशी, कल्पना पाटील,तनश्री गायकवाड, डी एम पाटील, योगेश केवारे, मनोज गायके, मुकेश सोनवणे,सचिन मिसाळ, बाळासाहेब भगनुरे, सचिन हावळे,चंद्रकांत वराडकर,विनोद काकडे, किशोर दुबे वैभव बोडके, पंढरीनाथ काकडे,बबन गवारे अमोल पाटील, रामदास नानवटे उत्तम लोकरे, रमेश तुपे, प्रकाश कावरखे, विकास पवार या सह अनेक मान्यवर मोठया संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०९ मे २०२६


## प्लॅस्टिकचा कहर

प्लॅस्टिक पिशव्यांचा
जिकडे तिकडे कहर
मानवजातीसाठी नित्य
ठरत आहे जहर

नालीमध्ये अडकून
तुंबते घाण पाणी
तयार झालेल्या डबक्यावर
डासांची मनमानी

डासामुळे जडे मानसाला
डेंगू , मलेरियाचा आजार
दवाखाण्याची करून वारी
होतो बिचारा बेजार

माणूस बनला आहे
प्लॅस्टिकचा दास
कसा थांबणार मग
पर्यावरणाचा ऱ्हास

कापडी पिशवी हाती घ्या
जातांना बाजारी
पडणार नाही मग
घरी कुणी आजारी

प्लॅस्टिक पिशव्यांना कुणी
नका लावू हात
जिवघेण्या संकटावर
करुया एकजुटीने मात



**- रवींद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106

# कळंकी येथील बाबुराव पाटील औराळकर विद्यालयाचा निकाल शंभर टक्के



**कन्नड (अरुण थोरात) :** कळंकी ता.कन्नड येथील बाबुराव माणिकराव पाटील औराळकर माध्यमिक विद्यालयाने आपल्या उज्वल गुणवत्तेची परंपरा कायम ठेवत यंदाच्या इयत्ता १० वी परिक्षेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. विद्यार्थ्यांच्या यशामागे सुक्ष्म अभ्यास, कठोर मेहनत, जिद्द व सातत्याच्या बळावर यश प्राप्त केले आहे . सर्व यशस्वी विद्यार्थांना शिक्षकांनी केलेले मोलाचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य महत्वाचे मानले जात आहे. दरवर्षी प्रमाणे गौरवशाली यशाची परंपरा सतत चालू ठेवण्याचा निर्धार येथील शिक्षकांनी व्यक्त केला आहे , यशस्वी विद्यार्थ्यांनी असेच यश मिळत राहो, त्यांच्या उज्वल भविष्यासाठी खुप शुभेच्छा दिल्या आहेत. इयत्ता दहावी परिक्षेत प्रथम क्रमांक - आदिती बाळू थोरात - ७१.४० टक्के, द्वितीय - धनश्री प्रभाकर थोरात - ६४ टक्के, तृतीय - पल्लवी विकास कदम - ६१.८० टक्के, चतुर्थ - निर्मला देवजी मेंगाळ - ६० टक्के गुण मिळविले आहेत. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे संस्थेच्या वतीने अभिनंदन करुण पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.









# शिवछत्रपती महाविद्यालयात गुणवंतांचा सत्कार



**छत्रपती संभाजीनगर :** शिवछत्रपती महाविद्यालयात बारावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आयोजित करण्यात आला होता. महाविद्यालयातून कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना महाविद्यालयात बोलावून त्यांचा यथोचित सत्कार आयोजित करण्यात आला होता. शिवछत्रपती महाविद्यालय हे शहरातील अग्रगण्य महाविद्यालयापैकी एक महाविद्यालय मानले जाते. या महाविद्यालयाला उत्कृष्ट निकालाच्या यशाची परंपरा लाभलेली आहे. याही वर्षी बारावी कला शाखेतून युवराज पेठवडजकर प्रथम, यशराज तुपे द्वितीय, प्रणाली बिडकर व रमेश घुगे तृतीय क्रमांकाने पास झाले आहेत. वाणिज्य शाखेतून अभिषेक जाधव प्रथम, आदिती कुलकर्णी द्वितीय, गुंजन सावजी तृतीय क्रमांकाने पास झाले व विज्ञान शाखेतून यश श्रीश्रीमल प्रथम, उन्नती पवार द्वितीय, आयुषका सरकटे आणि वरद वारदे तृतीय क्रमांकाने पास झाले आहेत. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सी. एस. पाटील यांनी विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी सतत कठोर परिश्रम करण्यासाठी तयार असले पाहिजे तरच यशाची उच्च शिखरे त्यांना गाठता येतील. शिवछत्रपती महाविद्यालयाचा विद्यार्थी भविष्यात कुठेही मागे राहणार नाही असा विश्वास प्राचार्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य भरत वहाटुळे ,डॉ. संगीता राजमाने पर्यवेक्षक डॉ अश्रूबा गवळी ,राहुल पाटील तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# मुरूम येथील प्रतिभा निकेतन विद्यालयाचा दहावीचा निकाल ९८.५३% ,निकालात मुलींचीच बाजी



**मुरूम (सुधीर पंचगल्ले) :** येथील नगर शिक्षण विकास मंडळ संचलित प्रतिभा निकेतन माध्यमिक विद्यालयाचा एकुण निकाल ९८.५३ टक्के लागला आहे.तर सेमी माध्यमाचा शंभर टक्के निकाल लागला आहे.शाळेने गेल्या अनेक वर्षांपासूनची निकालाची परंपरा कायम राखली आहे.या विद्यालयाचे विद्यार्थी विशेष प्रविण्यासह १४८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यावर्षी विद्यालयातुन सेमी १३६ माध्यमाच्या तर मराठी माध्यमाच्या ६९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती.यात विशेष प्राविण्यासह १४८ ,प्रथम श्रेणीत ४५,द्वितीय श्रेणीत ८ ,तृतीय श्रेणीत १ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.कांबळे ऋतुजा मोहन या विद्यार्थिनीने ९८.४० टक्के गुण व गणित विषयात पैकीच्या पैकी गुण मिळवत विद्यालयातून प्रथम क्रमांक पटकावला आहे.पाटील श्रुती गणपत व पाटील कल्याणी शंकर या विद्यार्थिनींनी ९६.४० टक्के गुण घेऊन द्वितीय क्रमांक पटकावला आहे.तर पाताळे सुप्रिया शरणाप्पा या विद्यार्थिनीने ९५.८० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावले आहे.विद्यालयाचे ३२ विद्यार्थी ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवत उत्तीर्ण झाले आहे.माजी मंत्री बसवराज पाटील,संस्थेचे अध्यक्ष बापुराव पाटील,प्राचार्य उल्हास घुरघुरे,उपमुख्याध्यापक राधाकृष्ण कोंढारे,पर्यवेक्षक विवेकानंद परसाळगे आदींसह शिक्षक शिवशरण तांबडे,बसवराज पाटील,इरफान मुजावर,सुरेश कांबळे,एम एस चव्हाण,प्रशांत मुरूमकर,पवन पाटील तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन कले आहे.शहर व परिसरातून उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०९ मे २०२६







# कालिकादेवी विद्यालयाचा दहावीच्या निकालात नवा विक्रम







**शिरूर कासार :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे,यांच्या वतीने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून शिरूर(कासार)येथील आदर्श शिक्षण संस्था बीड द्वारा संचलित,कालिकादेवी विद्यालयाने यंदा एस.एस.सी.बोर्ड परीक्षेच्या निकालात गरुड झेप नवा विक्रम प्रस्थापित केला आहे.विशेषत: विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या संकल्पनेतून 'श्रीकालिका गुणवत्ता पॅटर्न'हा विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी पहिल्यांदाच राबविला होता.परीक्षा मंडळाने यावर्षी सीसीटीव्ही कॅमेरे व झूमॲपद्वारे कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा घेऊनही केवळ 'श्रीकालिका पॅटर्नमुळेच'यंदा विद्यालयाचा निकाल दैदीप्यमान व नवा विक्रम प्रस्थापित करणारा आहे.तेव्हा विद्यालयाच्या एस.एस.सी.बोर्डाच्या निकालाचे खरे श्रेय 'श्रीकालिका पॅटर्नलाच' जाते.विद्यालयातील एकूण १४३ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले होते,त्यापैकी ११० विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले असून २८ विद्यार्थी प्रथम श्रेणीत,तर ०३ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.विशेषतः विद्यालयाचा गुणवंत विद्यार्थी चि.शोएब शौकत आतार याने १००% टक्के घेऊन विद्यालयातून प्रथम क्रमांक पटकाविला व कु.अनुष्का निलेश बडे हिने ९८.४०% टक्के घेऊन द्वितीय क्रमांक मिळविला.तर कु.श्रावणी संभाजी ढवळे ९७.००% टक्के मिळवून तृतीय क्रमांक पटकाविला तसेच चि.श्रेयस विठ्ठल केदार ९६.४०% टक्के,कु.अमृता अजिनाथ सवासे ९६.४०% टक्के,कु.अंकिता संजय गायकवाड ९६.२०% टक्के, कु.वैष्णवी मच्छिंद्र बांगर ९५.००% टक्के, कु.सृष्टी अशोक भुसारे ९५.००% टक्के, कु.प्रगती पांडुरंग गर्जे ९४.६०% टक्के,कु.भाग्यश्री बाळू गायके ९४.६० टक्के,कु.प्रगती मनोहर केदार ९४.४०% टक्के,कु.भक्ती आदिनाथ नागरगोजे ९४.२०% टक्के,चि.धनंजय धर्मराज तळेकर ९३.६०% टक्के,कु.आकांक्षा राजू बडे ९३.४०% टक्के घेऊन विशेष प्राविण्य मिळविले.अशी माहिती प्राचार्य केशव भांगे साहेब यांनी कळविली आहे.अशाप्रकारे विद्यालयाचा एकूण सरासरी निकाल ९८.६०% लागला आहे.यामुळे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव,तथा माजी मंत्री जयदत्त(अण्णा)क्षीरसागर साहेब,मा.रोहित(भैय्या)क्षीरसागर, प्रशासन अधिकारी डॉ.राजुजी मचाले साहेब,सहा.प्रशासन अधिकारी, श्री योगेशजी पवार साहेब,कार्यवाहक श्री एम.ए.राऊत सर,प्राचार्य केशव भांगे साहेब उपप्राचार्य बसवेश्वर देशमाने पर्यवेक्षक जनार्दन काळे,परीक्षा प्रमुख प्रा.नामदेव तरकसे,श्रीआप्पासाहेब कांबळे प्रा.विनोद गलांडे,सर्व कनिष्ठ प्राध्यापक,शिक्षकवृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारी,परिसरातील सर्वच पालकाने,व आजी-माजी विद्यार्थ्यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे हार्दिक-हार्दिक अभिनंदन केले असून,त्यांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.


दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |


# सत्यशोधक उच्च माध्यमिक विद्यालयाच्या १० वीच्या निकालाची परंपरा कायम



वैष्णवी गणेश जाधव



स्नेहा संतोष खोडके



ऋतुजा सुरेश जाधव

**गोषेगाव :** मानव विकास व पूर्ननिर्माण संशोधन संस्था, औरंगाबाद संचलित, सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गोषेगाव तालुका भोकरदन जिल्हा जालना येथील १० वी चा नुकताच निकाल जाहीर झाला असून निकाल १००% लागला आहे. यामध्ये प्रथम क्रमांक स्नेहा संतोष खोडके ९०.८०% द्वितीय क्रमांक वैष्णवी गणेश जाधव ९०.४०% तृतीय क्रमांक ऋतुजा सुरेश जाधव ८८.८०%सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष तथा प्राचार्य माननीय सुनीलजी वाकेकर साहेब व संस्थेच्या सचिव जयश्रीताई बनकर मॅडम यांनी हार्दिक अभिनंदन केले तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्याचप्रमाणे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनीही अभिनंदन केले आहेत.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०९ मे २०२६


# आई : ममतेचा अखंड झरा- डॉ. राजेंद्र बगाटे

मानवी जीवनाच्या प्रवासात अनेक नाती येतात, काही नाती काळाच्या ओघात बदलतात, काही नाती परिस्थितीनुसार दूर जातात; परंतु एक नाते असे असते जे जन्मापूर्वीपासून मृत्यूपर्यंत माणसाला सावलीसारखे साथ देत राहते, ते म्हणजे आईचे नाते. आई ही केवळ जन्मदात्री नसते, तर ती संस्कारांची पहिली शाळा, जीवनमूल्यांची पहिली गुरू, संघर्षात उभी राहणारी पहिली शक्ती आणि संकटसमयी धीर देणारी पहिली मैत्रीण असते. म्हणूनच जगभरात मातृत्वाचा सन्मान करण्यासाठी मे महिन्याच्या दुसऱ्या रविवारी 'मातृ दिन' साजरा केला जातो. हा दिवस केवळ औपचारिक शुभेच्छांचा किंवा सामाजिक माध्यमांवरील संदेशांचा दिवस नसून, आईच्या त्याग, प्रेम, कष्ट आणि ममतेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे.आई या शब्दामध्ये संपूर्ण विश्व सामावलेले आहे. एखाद्या बालकाचा जन्म होण्यापूर्वीच आईचे मातृत्व सुरू होते. स्वतःच्या शरीरात नवजीवन वाढवत असताना ती अनेक वेदना सहन करते. त्या वेदना सहन करताना तिच्या मनात भीतीपेक्षा आनंद अधिक असतो, कारण तिच्या पोटी वाढणाऱ्या जीवाबद्दल तिच्या मनात अपरंपार प्रेम असते. बालक जन्माला आल्यानंतर आई त्याचे पालनपोषण करताना स्वतःच्या सुख-दुःखाचा विचारही करत नाही. रात्रभर जागून मुलाला सांभाळणे, त्याच्या प्रत्येक गरजेची काळजी घेणे, त्याच्या आरोग्यापासून शिक्षणापर्यंत प्रत्येक गोष्टीत लक्ष घालणे हे आईचे जीवनकार्य बनते. म्हणूनच जगातील प्रत्येक महान व्यक्तीच्या यशामागे आईचे योगदान मोठे असते. भारतीय कुटुंब व्यवस्थेत आई ही घराचा केंद्रबिंदू मानली जाते. ती घरातील प्रत्येक सदस्याला प्रेमाने जोडून ठेवते. अनेकदा आर्थिक अडचणी, कौटुंबिक तणाव, सामाजिक दबाव अशा संकटांमध्येही आई आपल्या कुटुंबासाठी खंबीरपणे उभी राहते. स्वतःच्या इच्छा बाजूला ठेवून ती आपल्या मुलांच्या भवितव्यासाठी आयुष्यभर झटत असते. इतिहास आणि साहित्यामध्ये मातृत्वाचे अनेक प्रेरणादायी संदर्भ आढळतात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वावर जिजाऊंच्या संस्कारांचा खोल प्रभाव होता. जिजाऊंनी शिवरायांना स्वराज्याचे स्वप्न दाखवले आणि न्याय, शौर्य, धर्मनिष्ठा यांचे संस्कार दिले. म्हणूनच जिजाऊंना 'राजमाता' म्हणून गौरविले जाते. यावरून आई ही व्यक्तिमत्त्व घडवणारी महान शक्ती असल्याचे स्पष्ट होते.मातृ दिनाचा इतिहासही अत्यंत प्रेरणादायी आहे. अमेरिकेतील ॲना जार्विस या महिलेने आपल्या आईच्या स्मरणार्थ मातृ दिन साजरा करण्याची संकल्पना मांडली. त्यांच्या आई सामाजिक कार्यात सक्रिय होत्या. त्यांच्या निधनानंतर ॲना जार्विस यांनी आईच्या प्रेमाचा आणि मातृत्वाच्या मूल्यांचा गौरव करण्यासाठी विशेष दिवस साजरा करण्याचा आग्रह धरला. अखेरीस 1914 मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी मे महिन्याच्या दुसऱ्या रविवारी 'मदर्स डे' अधिकृतपणे साजरा करण्याची घोषणा केली. त्यानंतर जगभरात विविध देशांमध्ये मातृ दिन साजरा केला जाऊ लागला.आजच्या आधुनिक युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाने जग झपाट्याने बदलले आहे. जीवनशैली बदलली, कुटुंबव्यवस्था बदलली, नात्यांचे स्वरूपही बदलले; परंतु आईचे महत्त्व अजूनही अबाधित आहे. उलट धकाधकीच्या जीवनात आईची भूमिका अधिक महत्त्वाची बनली आहे. नोकरी, व्यवसाय, शिक्षण, सामाजिक जबाबदाऱ्या यांचा ताण वाढत असताना कुटुंब सांभाळण्याची मोठी जबाबदारी आईवर असते. अनेक महिला घर आणि करिअर यांचा समतोल साधत आपल्या कुटुंबासाठी झटताना दिसतात. त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम होत असल्या तरी घरातील जबाबदाऱ्या कमी झालेल्या नाहीत. त्यामुळे आधुनिक आईचे जीवन अधिक संघर्षमय झाले आहे.ग्रामीण भागातील आईचे जीवन विशेषतः कष्टमय असते. शेतीची कामे, जनावरांची देखभाल, घरातील कामे, मुलांचे संगोपन, वृद्धांची सेवा अशा अनेक जबाबदाऱ्या ती सांभाळत असते. अनेकदा तिला स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देण्यासाठीही वेळ मिळत नाही. तरीही ती तक्रार न करता आपल्या कुटुंबासाठी राबत राहते. ग्रामीण महिलांच्या या श्रमाचे आणि योगदानाचे योग्य मूल्यमापन समाजाने करणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील अनेक आई मुलांच्या शिक्षणासाठी स्वतः उपाशी राहून त्यांना शिकवतात. त्यामुळेच शिक्षणाच्या माध्यमातून अनेक मुले प्रगतीच्या शिखरावर पोहोचतात.शहरी भागातील मातृत्वालाही वेगळी आव्हाने आहेत. वाढती स्पर्धा, महागाई, लहान कुटुंब पद्धती, व्यावसायिक ताण आणि बदलती सामाजिक मूल्ये यामुळे शहरी महिलांवर मानसिक दबाव वाढला आहे. मुलांच्या शिक्षणासाठी, करिअरसाठी आणि सुरक्षित भविष्यासाठी आई सतत चिंतेत असते. डिजिटल युगात मुलांवर होणारे सामाजिक माध्यमांचे परिणाम, वाढती व्यसनाधीनता, हिंसक प्रवृत्ती आणि भावनिक दुरावा या समस्यांमुळे मातृत्वाची जबाबदारी अधिक गुंतागुंतीची बनली आहे. अशा परिस्थितीत आई केवळ पालनकर्ती राहत नाही, तर ती मार्गदर्शक, समुपदेशक आणि मानसिक आधारही बनते. आईच्या ममतेला कोणतीही सीमा नसते. मुलगा गरीब असो किंवा श्रीमंत, यशस्वी असो किंवा अपयशी, आईचे प्रेम कधी कमी होत नाही. मुलाने कितीही चुका केल्या तरी त्याला माफ करण्याची ताकद आईमध्ये असते. म्हणूनच आईचे प्रेम निरपेक्ष मानले जाते. जगात अनेक नाती स्वार्थावर आधारलेली असू शकतात; परंतु आईचे प्रेम केवळ ममतेवर आधारित असते. मुलाच्या आनंदात आनंद मानणे आणि त्याच्या दुःखात दुःखी होणे ही आईची नैसर्गिक भावना असते.आजच्या काळात वृद्धाश्रमांची वाढ ही चिंतेची बाब आहे. अनेक वृद्ध माता-पिता आपल्या मुलांपासून दूर वृद्धाश्रमात जीवन जगताना दिसतात. आधुनिक जीवनशैली, करिअरची धावपळ आणि बदलती कौटुंबिक मूल्ये यामुळे काही ठिकाणी पालकांविषयीची संवेदनशीलता कमी होताना दिसते. ज्यांनी आयुष्यभर मुलांसाठी कष्ट केले, त्याच आई-वडिलांना वृद्धापकाळात एकटेपण सहन करावे लागणे ही अत्यंत वेदनादायी बाब आहे. मातृ दिन साजरा करताना समाजाने या वास्तवाकडे गंभीरपणे पाहण्याची गरज आहे. आईचा सन्मान केवळ एका दिवसापुरता मर्यादित न राहता तो आपल्या वर्तनातून दिसला पाहिजे.भारतीय स्त्रियांनी मातृत्वासोबतच विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य केले आहे. शिक्षण, विज्ञान, साहित्य, राजकारण, क्रीडा, संरक्षण, कला, उद्योग अशा प्रत्येक क्षेत्रात महिलांनी यश मिळवले आहे. या यशामागे त्यांची जिद्द आणि कुटुंबासाठीची बांधिलकी दिसून येते. अनेक महिला आपल्या व्यावसायिक जबाबदाऱ्यांसोबत मुलांचे संगोपनही यशस्वीपणे करतात. त्यामुळे आधुनिक मातृत्व अधिक सक्षम आणि बहुआयामी बनले आहे.कोरोना महामारीच्या काळात आईचे महत्त्व अधिक प्रकर्षाने जाणवले. लॉकडाऊनच्या काळात संपूर्ण कुटुंब घरात असताना महिलांवर कामाचा ताण वाढला होता. घरातील सर्व सदस्यांची काळजी घेणे, स्वच्छता राखणे, मुलांच्या ऑनलाइन शिक्षणाची जबाबदारी सांभाळणे, आजारी व्यक्तींची सेवा करणे अशा अनेक भूमिका महिलांनी निभावल्या. आरोग्य क्षेत्रात कार्यरत असलेल्या अनेक महिला डॉक्टर, परिचारिका आणि आरोग्य कर्मचारी यांनी स्वतःच्या कुटुंबापेक्षा समाजसेवेला प्राधान्य दिले. या काळात मातृत्वाची संवेदनशीलता आणि त्याग समाजाने जवळून अनुभवला.आई ही मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासाची पहिली शिल्पकार असते. बालपणात मिळालेले संस्कार व्यक्तीच्या संपूर्ण आयुष्यावर प्रभाव टाकतात. प्रामाणिकपणा, शिस्त, सहकार्य, करुणा, परिश्रम, सामाजिक जबाबदारी यांसारखी मूल्ये मुलांना आईकडूनच शिकायला मिळतात. आई मुलांच्या मनात आत्मविश्वास निर्माण करते. मुलांना संकटांचा सामना करण्याची ताकद देते. म्हणूनच समाजाच्या नैतिक बांधणीमध्ये मातृत्वाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.साहित्य, कला आणि संस्कृतीमध्ये आईचे स्थान विशेष आहे. मराठी साहित्यात अनेक कवींनी आणि लेखकांनी आईच्या ममतेचे हृदयस्पर्शी चित्रण केले आहे. कविवर्य कुसुमाग्रज, साने गुरुजी, वि. स. खांडेकर, बहिणाबाई चौधरी यांसारख्या साहित्यिकांनी आईच्या प्रेमाचा गौरव केला आहे. साने गुरुजींचे 'श्यामची आई' हे पुस्तक मातृत्वाच्या संवेदनशीलतेचे उत्कृष्ट उदाहरण मानले जाते. या पुस्तकातून आईचे संस्कार, त्याग आणि नैतिक मूल्ये प्रभावीपणे समोर येतात. मराठी चित्रपट आणि संगीतामध्येही आईवरील अनेक भावस्पर्शी गीते लोकप्रिय आहेत.मातृत्व हे केवळ जैविक नाते नसून भावनिक आणि सांस्कृतिक नाते आहे. अनेक महिला स्वतःची मुले नसतानाही इतर मुलांचे संगोपन करतात. अनाथ मुलांना आश्रय देणाऱ्या महिला, समाजसेविका, शिक्षिका आणि सेवाभावी स्त्रिया या देखील मातृत्वाचेच रूप आहेत. समाजातील दुर्बल, वंचित आणि गरजू मुलांसाठी कार्य करणाऱ्या महिलांनी मातृत्वाला व्यापक सामाजिक स्वरूप दिले आहे.स्त्री सक्षमीकरणाच्या चर्चेमध्ये मातृत्वाचा प्रश्न महत्त्वाचा आहे. महिलांना मातृत्वासोबत करिअर आणि वैयक्तिक आयुष्य यांचा समतोल साधण्यासाठी समाज आणि शासनाने आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. प्रसूती रजा, बालसंगोपन केंद्रे, सुरक्षित कार्यस्थळे, आरोग्य सुविधा आणि समान संधी यामुळे महिलांचे जीवन अधिक सुलभ होऊ शकते. मातृत्व ही केवळ महिलांची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे, ही जाणीव विकसित होणे आवश्यक आहे.आजच्या डिजिटल युगात अनेकदा कुटुंबातील संवाद कमी होताना दिसतो. मोबाइल, इंटरनेट आणि सामाजिक माध्यमांमुळे माणसे आभासी जगात अधिक रमू लागली आहेत. अशा परिस्थितीत कुटुंबातील भावनिक नातेसंबंध टिकवून ठेवण्याचे मोठे कार्य आई करत असते. ती कुटुंबाला एकत्र ठेवण्याचा प्रयत्न करते. मुलांमध्ये संवेदनशीलता, संस्कार आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी आईची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते.मातृ दिन साजरा करताना केवळ भेटवस्तू देणे किंवा शुभेच्छा देणे पुरेसे नाही. आईच्या भावना समजून घेणे, तिच्या कष्टांची जाणीव ठेवणे आणि तिला सन्मानाने वागवणे अधिक महत्त्वाचे आहे. अनेकदा आई स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करते. त्यामुळे तिच्या आरोग्याची काळजी घेणे, तिला विश्रांती मिळेल याची व्यवस्था करणे, घरकामात मदत करणे आणि तिच्यासोबत वेळ घालवणे ही खरी कृतज्ञता ठरते.समाजातील अनेक महिलांना आजही शिक्षण, आरोग्य, पोषण आणि आर्थिक स्वावलंबनाच्या समस्या भेडसावत आहेत. ग्रामीण आणि आदिवासी भागातील गर्भवती महिलांना योग्य आरोग्य सुविधा मिळत नाहीत. कुपोषण, बालविवाह, मातामृत्यू आणि लैंगिक भेदभाव या समस्या अजूनही गंभीर आहेत. मातृत्वाचा सन्मान करायचा असेल तर महिलांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करणे आवश्यक आहे. समाजातील प्रत्येक आईला सुरक्षित, सन्मानजनक आणि आरोग्यपूर्ण जीवन मिळणे हीच मातृ दिनाची खरी भावना आहे.भारतीय कुटुंब व्यवस्थेत आई अनेकदा स्वतःच्या इच्छा आणि स्वप्ने बाजूला ठेवते. मुलांचे शिक्षण, कुटुंबाचे भविष्य आणि घराची जबाबदारी यासाठी ती स्वतःच्या आवडी-निवडींचा त्याग करते. अनेक महिलांना आपल्या कौशल्यांचा विकास करण्याची संधी मिळत नाही. त्यामुळे महिलांना शिक्षण, रोजगार आणि आत्मविकासाच्या संधी उपलब्ध करून देणे हे समाजाचे कर्तव्य आहे.आई ही संकटसमयी धीर देणारी शक्ती असते. जीवनात अपयश आले, अडचणी निर्माण झाल्या किंवा माणूस निराश झाला तर त्याला उभारी देणारे पहिले व्यक्तिमत्त्व म्हणजे आई असते. तिचे शब्द माणसाला नवसंजीवनी देतात. म्हणूनच अनेक महान व्यक्तींनी आपल्या यशाचे श्रेय आईला दिले आहे. आईचा आशीर्वाद आणि विश्वास माणसाला मोठ्या संघर्षातून पुढे जाण्याची प्रेरणा देतो. भारतीय लोकसंस्कृतीमध्ये आईचे रूप विविध प्रकारे व्यक्त झाले आहे. लोकगीते, अभंग, ओव्या, म्हणी आणि कथांमध्ये मातृत्वाचे भावनिक चित्रण आढळते. ग्रामीण भागातील स्त्रिया काम करताना म्हणणाऱ्या ओव्यांमध्ये आईचे दुःख, प्रेम आणि संघर्ष प्रतिबिंबित होतात.आई आणि पर्यावरण यांच्यामध्येही एक प्रतीकात्मक साम्य आहे. जशी आई आपल्या मुलांचे संगोपन करते, तसेच पृथ्वी संपूर्ण सृष्टीचे पालनपोषण करते. म्हणूनच पृथ्वीला 'धरतीमाता' म्हटले जाते. पर्यावरणाचे संरक्षण करणे म्हणजे भविचा वाटतो. तिच्या चेहऱ्यावरचे समाधान आणि आनंद हेच मुलांसाठी सर्वात मोठे यश असते.आज अनेक माता आपल्या मुलांना उच्च शिक्षणासाठी दूर पाठवतात. मुलांच्या प्रगतीसाठी स्वतःच्या भावनांवर नियंत्रण ठेवून त्या त्यांना प्रोत्साहन देतात. मुलगा किंवा मुलगी परदेशात असली तरी आईचे मन सतत त्यांच्या काळजीत गुंतलेले असते. तंत्रज्ञानामुळे अंतर कमी झाले असले तरी आईच्या प्रत्यक्ष सहवासाची जागा कोणतीही गोष्ट घेऊ शकत नाही.मातृत्वाचे आणखी एक महत्त्वाचे रूप म्हणजे दत्तक मातृत्व. अनेक कुटुंबे अनाथ मुलांना दत्तक घेऊन त्यांना प्रेम आणि आधार देतात. अशा मातांनी मातृत्वाची व्याख्या अधिक व्यापक केली आहे. रक्ताच्या नात्यापेक्षा प्रेमाचे नाते अधिक महत्त्वाचे असते, हे या उदाहरणांतून दिसून येते.भारतीय समाजामध्ये सिंगल मदर्स म्हणजेच एकल मातांची संख्या वाढताना दिसत आहे. विविध सामाजिक आणि वैयक्तिक कारणांमुळे अनेक महिला एकट्याने मुलांचे संगोपन करतात. अशा महिलांना आर्थिक, सामाजिक आणि मानसिक आव्हानांचा सामना करावा लागतो. तरीही त्या खंबीरपणे आपल्या मुलांचे भविष्य घडवण्यासाठी संघर्ष करतात. समाजाने अशा मातांकडे सहानुभूतीने आणि सन्मानाने पाहण्याची गरज आहे. आईच्या कष्टांची जाणीव अनेकदा मुलांना उशिरा होते. बालपणात आईचे प्रेम सहज मिळत असल्याने त्याची किंमत समजत नाही; परंतु आयुष्याच्या विविध टप्प्यांवर आईच्या त्यागाचे महत्त्व लक्षात येते. म्हणूनच आई जिवंत असताना तिच्यावर प्रेम व्यक्त करणे आवश्यक आहे. अनेकदा माणसे आई गेल्यानंतर तिच्या आठवणींमध्ये हरवतात; परंतु खरा सन्मान तिच्या आयुष्यातच केला पाहिजे.मातृ दिनाच्या निमित्ताने समाजाने महिलांच्या आरोग्याविषयी अधिक जागरूक होण्याची गरज आहे. गर्भवती महिलांचे आरोग्य, पोषण, मानसिक स्वास्थ्य आणि प्रसूतीनंतरची काळजी यावर विशेष लक्ष दिले पाहिजे. ग्रामीण भागात आरोग्य सुविधा अधिक सक्षम करण्याची गरज आहे. मातामृत्यूचे प्रमाण कमी करणे आणि प्रत्येक महिलेला सुरक्षित मातृत्वाचा अधिकार मिळवून देणे हे समाज आणि शासनाचे कर्तव्य आहे.आई ही संस्कृतीची वाहक असते. भाषा, परंपरा, सण-उत्सव, नैतिक मूल्ये आणि सामाजिक जाणीवा या सर्व गोष्टी आईकडून पुढील पिढीकडे जातात. घरामध्ये बोलली जाणारी भाषा, आचार-विचार आणि संस्कार यामध्ये आईची भूमिका केंद्रस्थानी असते. त्यामुळे समाजाच्या सांस्कृतिक सातत्यामध्ये मातृत्वाचे योगदान अत्यंत मोठे आहे.शिक्षण क्षेत्रातही अनेक मातांनी मोठे योगदान दिले आहे. अनेक निरक्षर माता आपल्या मुलांना शिकवण्यासाठी संघर्ष करतात. स्वतः शिक्षण न मिळाल्याची खंत त्या मुलांच्या शिक्षणाद्वारे दूर करण्याचा प्रयत्न करतात. गरीब कुटुंबातील अनेक माता मजुरी करून मुलांचे शिक्षण पूर्ण करतात. अशा मातांचा संघर्ष समाजासाठी प्रेरणादायी आहे.मातृत्वाचा संबंध केवळ भावना आणि त्यागाशी नसून शक्ती आणि नेतृत्वाशीही आहे. इतिहासामध्ये अनेक महिलांनी संकटसमयी नेतृत्व करून समाजाला दिशा दिली आहे. जिजाऊ, अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले, रमाबाई आंबेडकर, यांसारख्या महिलांनी मातृत्वाच्या मूल्यांना सामाजिक परिवर्तनाशी जोडले. त्यांनी समाजातील दुर्बल घटकांसाठी कार्य करून स्त्रीशक्तीचे सामर्थ्य सिद्ध केले. आजच्या बदलत्या काळात मुलांनीही आपल्या आई-वडिलांप्रती जबाबदारीची जाणीव ठेवली पाहिजे. करिअर, पैसा आणि वैयक्तिक यशाच्या मागे धावताना कुटुंबाकडे दुर्लक्ष होऊ नये. आई-वडिलांसोबत संवाद साधणे, त्यांना भावनिक आधार देणे आणि त्यांच्या गरजांची काळजी घेणे ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे. मातृ दिनाचा खरा संदेश म्हणजे प्रेम, कृतज्ञता आणि संवेदनशीलता. आईचे ऋण कधीही फेडता येत नाही; परंतु तिचा सन्मान करून, तिच्या कष्टांची जाणीव ठेवून आणि तिच्या स्वप्नांना आधार देऊन आपण तिच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करू शकतो. समाजातील प्रत्येक महिलेला सुरक्षित, सन्मानजनक आणि आनंदी जीवन मिळाले तरच मातृ दिनाचा उत्सव अर्थपूर्ण ठरेल.आजच्या वेगवान जगात माणसांमधील भावनिक नाती टिकवून ठेवणे मोठे आव्हान बनले आहे. अशा काळात आईचे प्रेम माणसाला माणुसकीची जाणीव करून देते. आईच्या ममतेमध्ये स्वार्थ नसतो, दिखावा नसतो; असते ती फक्त निस्सीम करुणा. म्हणूनच आई हा प्रत्येकाच्या जीवनातील सर्वात मोठा आधार असतो.मातृ दिनाच्या निमित्ताने आपण प्रत्येकाने एक संकल्प केला पाहिजे की, आईचा सन्मान केवळ एका दिवसापुरता मर्यादित ठेवायचा नाही. तिच्या भावना समजून घेऊन, तिच्या आरोग्याची काळजी घेऊन, तिच्यासोबत वेळ घालवून आणि तिच्या स्वप्नांना पाठबळ देऊन आपण तिच्या आयुष्याला आनंदी बनवूया. कारण आई आनंदी असेल तर कुटुंब आनंदी राहील आणि कुटुंब आनंदी असेल तर समाजही अधिक संवेदनशील, सुसंस्कृत आणि प्रगतिशील बनेल.आई ही जीवनाची पहिली कविता आहे, पहिली प्रार्थना आहे, पहिली शाळा आहे आणि पहिला देव आहे. तिच्या ममतेचा सुगंध आयुष्यभर मनात दरवळत राहतो. म्हणूनच मातृ दिन हा केवळ कॅलेंडरवरील दिवस नसून, मानवी संवेदनशीलतेचा, प्रेमाचा आणि कृतज्ञतेचा उत्सव आहे. प्रत्येकाच्या जीवनात आईचे स्थान अद्वितीय आहे आणि म्हणूनच जगातील कोणतीही शक्ती आईच्या प्रेमाची बरोबरी करू शकत नाही. मातृत्वाच्या या पवित्र भावनेला प्रणाम करताना एवढेच म्हणावेसे वाटते की, 'आई' हा शब्द उच्चारला की मनाला मिळणारी शांतता आणि आधार जगातील कोणत्याही संपत्तीपेक्षा अधिक मौल्यवान आहे.




**- डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत) ईमेल —**
**bagate.rajendra५@gmail.com**